MSEB च्या तारेवर टाकला होता आकडा...
लग्नच माझे नाही ठरले तर नाव कोणाचे घेऊ रे माकडा...

***रावांची थोरवी मी सांगत नाही
कितीही प्याले तरीही ते कधीही झिंगत नाहीत !!

इराण्याच्या चहा बरोबर मिळतो मस्का पाव
**** रावांची बाहेर किती लफडी ते विचारू नका राव !!

सचीनच्या बॅट ला करते नमस्कार वाकून
***** रावांचे नाव घेते पाच गडी राखून

पावाबरोबर खाल्ले अमूल बटर...
***चे नाव घ्यायला अडलय माझ खेटर

एक होती चिऊ एक होती काऊ...
***रावांच नाव घेते , डोक नका खाऊ...

अंबाबाईच्या देवळाला सोन्याचा कळस
*** चं नाव घ्यायचा मला नाही आळस

कुत्र्यात कुत्र अल्सेशिअन कुत्र
-----नी गळ्यात बांधले मंगळसूत्र

ईवले ईवले हरीण, त्याचे ईवले ईवले पाय,
****** राव आले नाहीत अजुन,
पिउन पडले की काय.......

चांदीच्या ताटात ठेवले होते गहू
लग्नच झाले नाही तर नाव कसे घेऊ

एक होती चिऊ एक होती काऊ

गणपत रावांच नाव घेते , डोक नका खाऊ

अंगणात पेरले पोतेभर गहू
लिस्ट आहे मोठी, कुणा-कुणाचे नाव घेऊ

चांदीच्या ताटात जिलेबीचे तुकडे
घास भरवते मरतुकड्या, थोबाड कर इकडे

बागेमध्ये असतात, गुलाबांच्या कळ्या
गणपतरावांचे दात म्हणजे दुकानाच्या फ़ळ्या

लग्नाच्या पंक्तीत घेतला उखाणा खास
अन गणपतरावांच्या घशात अडकला घास

आजघर माजघर माजघराला नाही दार
गणपतरावांच्या घरात मात्र विंडोज दोन हजार

कर्दळीच्या वनात चंडोल पक्षी लपला
........शी लग्न करून ......जन्माचा धुपला

कंप्युटरला असते फ़्लॉपी डिस्क
हिच्याशी लग्न करून मी घेतलिय मोठी रिस्क

रेशमी सदऱ्याला प्लास्टीकचे बक्कल
गणपतरावांना आहे टक्कल, पण डोक्यात नाही अक्कल

समुद्रच्या काठावर मऊ मऊ वाळू
गणपतराव दिसतात साधे, पण आतून एकदम चालू

लाडाने जवळ गेले, केली जरा घसट
गणपतराव एकदम खेकसले, फ़ारच बाई तिरसट

बदामाचा केला हलवा त्यात काजू टाकले किसुन.
*****राव बिड्या पितात संडासात बसून

आजकाल च्या लग्न ठरलेल्या मुलीसाठी..

मोबाईल वर एफ़ एम् एकते कानात हेडफोन टाकुन ......
मोबाईल वर एफ़ एम् एकते कानात हेडफोन टाकुन ......
आणि ....... रावना मिस कॉल देते एक रूपया बैलेंस राखून..

बागे मध्ये असतात गुलाबाच्या काळ्या
गणपतरावांचे दात म्हणजे दुकानच्या फाल्या

इतिहासाच्या पुस्तकाला भूगोलाचे कव्हर
................च नाव घेते .............. ची लव्हर

वन टू थ्री .......................
........ चे नाव घेते मला करा फ्री

कापवर कप सात कप त्यावर ठेवली बशी
माझी बायको सोडून सर्वांच्या बायका म्हशी

स्टुलावर स्तुला बत्तिस स्तुल
............ राव एकदम ब्यूटिफुल

........ चा नि माझा संसार होईल सुखकर
जेव्हा मी चीरेन भाजी आणि तो लावेल कुकर

गाडीत गाडी डेक्कन क्वीन
......... आहे माझी ब्युटी क्वीन

पहिली सोनी, दुसरी मनी, तिसरी जणी
सोडल्या तिघीजणी नी झालो तकी धनी

कंप्यूटर ला असते फ्लोपी डिस्क
गंगुबाई शी लग्न करून मी घेतली मोठी रिस्क

वाकडी तीकडी बाभुला तिच्यावर बसला हेला
सखा पाटील मेला म्हणून तुका पाटील केला

चांदीच्या ताटात जिलेबेचे तुकडे
घास भरवते मरतूकड्या, तोंड कर इकडे

शिडीवर शीडी बत्तिस शीडी
गणपतराव ओढतात विडी नि मी लावते काडी

रेशमचा सदरा त्याला प्लास्टिक चे बक्कल
...........राव आहेत सुंदर पण डोक्याला टक्कल

इवल्या इवल्या हरणाचे इवले इवले पाय
गणपतराव अजुन आले नाहीत, पिऊन पडलेट की काय ?

समुद्राच्या काठावर मुऊ मुऊ वाळू
शंकरराव दिसतात साधे पण आहे आतून चालू

तेलाच्या दिव्याला तूपाची वात
शंकररावंशी करून लग्न लावली आयुष्याची वाट

चंदेरी चळिला सोनेरी बटन
........ रावांना आवडते तंदुरी चिकन

चांदीच्या ताटात ठेवले होते गहू
लगनच झाले नाही तर नाव कसे घेऊ

कालच चित्रपट पाहिला नाव त्याचे सायको
फाल्गुन रावांचे नाव घेते गणपतरावांची बायको

लग्नाच्या पंगतीत घेतला उखाना खास
आणि गणपतरावांच्या घशात अडकला घास

गुलाबाच्या काळी ला बाकुळीचा त्रास
गणपतराव बनले माझ्या आयुष्याचा त्रास

एक होती चिऊ एक होती काऊ
गणपतरावांचे नाव घेते डोके नका खाऊ...

अंगणात पेरले पोतेभर गहू
यादी आहे मोठी कुणा कुणाचे नाव घेऊ।

तळ्यातल्या चिखलात लाल लाल कमळ उमळले
गणपतराव खाड्यात पडले, त्यांना दुसरने काढले

आलीकडे अमेरिका पलीकडे अमेरिका
नाव घ्यायला सांगू नका मी आहे कुमारिका

संसारातल्या संकटांची नाही पर्वा आता
साथ आहे माझ्याबरोबर ......कांता !!!!!

दासांचा दासबोध अनुभवाचा साठा
....चे नाव घेतो तुमचा मान मोठा !!!!!

रंभा मेनका स्वर्गलोकीच्या अप्सरा
.....चा पायगुण शकुनी खरा !!!!!

संसाररूपी सागरात पतिपत्नींची नौका
.....चे नाव घेतो सर्वजण ऐका !!!!!

सितेसारखे चरित्र, रंभेसारखे रूप
.....मिळाली आहे मला अनुरूप

नाशिकची द्राक्षे, नागपूरची संत्री
.....झाली आज माझी गृहमंत्री !!!!!

दुर्वाची जुडी वाहतो गजाननाला
सौ.....सारखी पत्नी मिळाली आनंद झाला मला !!!!!

वसंतात दरवळतो फुलांचा सुवास
सौ.....सोबत सुरु केला जीवनाचा प्रवास !!!!!

दोन शिंपले एक मोती, दोन वाती एक ज्योती
माझी आणि सौ.....ची अखंड राहो प्रीती !!!!!

जीवनरूपी सागरात सुखदु:खाच्या लाटा
सुखी संसारात सौ..... चा अर्धा वाटा !!!!!

देवाच्या देव्हाऱ्यात फुलांना प्रथम स्थान
सौ.....ने दिला मला पतिराजांचा मान !!!!!

बकूळ फुलांचा सदा पडे अंगणी
सौ..... आहे माझी अर्धांगिनी !!!!!

आम्रवृक्षाच्या छायेत कोकिळा करते कुजन
सौ.....सोबत करतो मी लक्ष्मीपुजन !!!!!

दवबिन्दुच्या थेंबाने चमकतो फुलांचा रंग
सुखी आहे संसारात सौ..... च्या संग !!!!!

गाण्यांच्या सुराला तबल्याची साथ
सौ....ने दिला मला प्रेमाचा साथ !!!!!

सासूबाई आहेत प्रेमळ, मेहुणी आहे हौशी
सौ.....चे नाव घेताना मला होते ख़ुशी !!!!!

अंधश्रद्धेचा पाश करी स्त्रियांचा नाश
सौ....चे नाव घेतो तुमच्यासाठी खास !!!!!

चांदीच्या वाटीत दहीभाताचा काला
सौ....चे नाव घेता पहिला आरंभ केला !!!!!

चंदनाच्या झाडाला नागिणीचा वेढा
सौ.....चा आणि माझा जान्मोजन्माचा जोडा !!!!!

इंग्रजी भाषेत चहाला म्हणतात टी
सौ....चे नाव घेण्यास लागते डबल फी !!!!!

हिमालय पर्वतात बर्फाच्या राशी
सौ.....चे नाव घेतो अक्षता पडल्याच्या दिवशी !!!!!